# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ )

जा.क्र. ४१८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:-१६/०७/२०१६.

**१) तक्रार केल्याने भांडण व मारहान करुन धमकी दिली . :-**

दिनांक १५/०७/२०१६ रोजी १७.०० वा. दर. मानिक देवाजी जिवतोडे वय ३५ वर्ष, रा. पिपळगाव सडक हे भवानि बहुदेशिय गौरक्षक संस्था पिपंळगावचे उपाध्यक्ष असुन त्या संस्थेचे सचिव आरोपी क्र. १ हा त्यांच्या संस्थेचे बाकी सदस्यांना हिसाब न दिल्याने फिर्यादीने आरोपी क्र. १ च्या विरोधात धर्मदाय आयुक्त भंडारा यांचे कडे तक्रार दिल्याने, त्या तक्रारीला चिडुन जावुन आमचे विरोधात खुप काही तक्रार केली असे आरोपी क्र. १ते ३ यांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरी जावुन त्यांच्याशी वाद करुन चप्पलाने दोन्ही गालावर, काठीने, विटाने, नाकावर, डावे हाताचे कोणीजवळ व कमरेवर मारपीट करुन दुखापत केली. असी धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४८,३२३,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) ॲम्ब्युलंसची उभ्या कारला धडक दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १४/०७/०१६ रोजी २२.३० ते २३.०० वा. यातील आरोपी चालक याने आपल्या ताब्यातील वाहन रस्त्याचे वळणाने भरधाव व निष्काळजी पने चालवुन रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कार क्र. एमएच ३५/ पी ३०१० हिला लाखांदुर पिपंळगाव रोडवर टेलीफोन एक्सचेज जवळील येथे धडक मारुन २,००,०००/रु. चे नुकसान केले. असे फिर्यादी मनोज जागेश्वर गायकवाड वय ३२ वर्ष, रा. अर्जुनी मोर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,४२७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) महिलेस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ३०/०७/०१६ रोजी १९.३० वा. दर. फिर्यादी ही आपल्या घरा समोर हजर असता यातील आरोपी हा दारु पिवुन येवुन दारुचे नशेत घरा समोर पाणी साचल्याचे कारणावरुन भांडण केले. व फिर्यादीस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. या कारणावरुन फिर्यादी यांनी कोर्टात फिर्याद दाखल केली आज रोजी कोर्ट मोहरर यांनी विदयमान न्यायालय गुन्हा नोद करणे संबंधी पत्र सादर केल्यावरुन गुन्हा नोंद केला. फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. कडपते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) ट्रॅक्टर बाधीत फसल्याने इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक १५/०७/०१६ रोजी १६.३० वा. दर. भगवान शालीकराम चांदेवार वय ४० वर्ष, रा. बाम्पेवाडा हे त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एमएच ३६/७१८९ ने स्वता:च्या शेतातील बांधीत चिखल करीत असतांनी अचानक ट्रॅक्टर बांधीचे मध्य भागी फसल्याने तो काढीत असतांनी ट्रॅक्टर पलटी होवुन ट्रॅक्टर खाली दबुन मरण पावले. फिर्यादी खुशाल शालीकराम चांदेवार वय ४० वर्ष, रा. बाम्पेवाडा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत

**( श्री.बी .आर.गाडे)**
**प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.